# अनुवंशिक सुधारणा योजना पशुपालकांना एक वरदान

मी श्री भगवान काशिनाथ कोळी, रा.लोहटार, ता.पाचोरा जि.जळगाव माझ्या कडे ३ एकर शेती असुन, माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह दुग्ध उत्पादन व शेती यातुन येणाऱ्या उत्पन्नाने होतो. सन २०१३/१४ मध्ये माझ्या गायीची अनुवंशीक सुधारणा योजनेमध्ये निवड झाली. कुत्रिम रेतनाने माझी गाय गाभन राहीली. प्रसुती नंतर गायीने सुंदर अश्या कालवडीस जन्म दिला. अनुवंशीक सुधारणा योजनेत ६ महिन्यांपर्यंत १०० किलो वजन झाल्यास ५,००० रूपये प्रोत्साहन पर मानधन मिळत असल्याने आमचे पशुवैद्य श्री.संदीप पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे कालवडीचा जन्म झाल्याच्या अर्ध्या तासात चिक पाजला, वयाच्या दोन आठवड्यापर्यंत दुध पाजले. तिसऱ्या आठवड्यापासुन आहार ( काफ स्टार्टर) देण्यास सुरूवात केली. प्रत्येक आठवड्यास श्री.पाटील यांच्या सल्ल्याप्रमाणे आहार वाढविला व हिरवा चारा ही देवू लागलो. ९ व १० व्या आठवड्यात दुध संपूर्ण बंद केले. साधारण १३ ते १४ आठवड्यापासुन २ किलो आहार सुरू केल्याने ६ महिन्यात माझ्या कालवडीचे खाद्यामुळे उंची, लांबी, वजन छातीचा घेर व रोगप्रतिकार शक्ती वाढली.

यापुर्वी मी कालवडीला याप्रमाणे संगोपन करीत नव्हतो. त्यामुळे कालवडीची लांबी, वजन, छातीचा घेर व रोगप्रतिकार शक्ती वाढत नव्हती.

अनुवंशीक सुधारणा योजनेअंतर्गत ६ महिन्यानंतर माझ्या कालवडीचे वजन १०५ किलो झाल्याने प्रस्ताव सादर करून मला ५,००० रूपये मानधन महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाकडून मिळाले. या पैशांचा वापर कालवड जोपासण्याठीच करावा असे आमचे पशुवैद्य श्री.संदीप पाटील यांनी सांगितल्याने मी कालवडीस ७ महिन्यापासून माजावर येईपर्यंत २ किलो पशुखाद्य प्रती दिवस दिले. खाद्य दिल्याने माझी कालवड वयाच्या १६ महिन्यात माजावर आली. पहिला माज सोडून दुसऱ्या माजाला मी आमच्या पशुवैद्यकीय दवाखान्यातुन कृत्रिम रेतन करून घेतले. आज माझी कालवड गाभण आहे.

पशुसंवर्धन विभागाकडून सुरू करण्यात आलेल्या अंनुवंशीक सुधारणा योजनेमुळे कालवड जोपासनेची आवड लागली व मार्गदर्शन मिळून मिळणाऱ्या प्रोत्साहन पर मानधनामुळे खाद्य कालवडीस देवू शकल्याने कालवडीची योग्य वाढ होवून ती गाभण राहीली. तिची प्रसुती होवून तीच्या दुध उत्पादनाने माझ्या उत्पन्नात भर पडली व पुन्हा मला एक कालवड मिळाली नक्कीच म्हणुन मी म्हणतो अनुवंशीक सुधारणा योजना पशुपालकांना एक वरदान आहे. व पुन्हा माझ्या या कालवडीचेही या योजनेत समावेश होणार असल्याचा आनंद मला आहे.

ही योजना राबविणारे पशुसंवर्धन विभाग व ही योजना आमच्यापर्यंत पोहचवून मार्गदर्शन करणारे आमच्या पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुवैद्य श्री.संदीप पाटील यांचे आभारी आहे.





भगवान काशिनाथ कोळी

भगवान काशिनाथ कोळी

← कालवडीसोबत वडील काशिनाथ कोळी

ही योजना पशुपालकाच्या गोठ्यात असलेल्या गुरांमध्ये त्यांच्या सारखे दुसरे जातीवंत पशु निर्माण करणे म्हणजे पशुसंवर्धन, पशु संवर्धनाची प्रवृत्ती टिकविण्यास फार उपयोगी आहे.

श्री.संदीप नारायण पाटील

पशुधन पर्यवेक्षक,प.वै.द. श्रेणी -२,लोहटार, ता.पाचोरा

# देवगाय झाली आई

## यशकथा



श्री.दिलीप निळकंठ पाटील
लोहटार,ता.पाचोरा

मी श्री.दिलीप निळकंठ पाटील, रा.लोहटार, ता.पाचोरा जि.जळगाव माझ्याकडे बांभोरी येथून दुधासाठी सुंदर नावाची गाय मी पाच वर्षापूर्वी आणली. त्या गायीने एका अपंगत्व असलेल्या कालवडीस जन्म दिला. ह्या कालवडीस शेपूट नव्हते व एक डोळाही जन्मजात नव्हता. ह्या कालवडीस अपंगत्व असल्याने वाचणार नाही असे लोक म्हणायचे परंतु ही माझ्या गायीची कालवड देवाची आहे असे समजून मी जिद्दीने तिला वाढीस लावले.

माझी ही कालवड तीन वर्षाची झाल्यावर माजावर आली, दुसऱ्या माजास कुत्रिम रेतन करणे कामी मी आमच्या गावातील पशुवैद्यकीय दवाखान्यात घेवून गेलो. दवाखान्याचे पशुवैद्य श्री.संदीप पाटील यांनी कालवडीची तपासणी केली असता आश्चर्य व्यक्त करून सांगितले कालवडीस गर्भाशयाच्या दोन शिंगांपैकी एकच भाग आहे. एकच भाग असल्याने गर्भ धारणा ५० ते ८० % होणार नाही असे वाटते. मी नाराज झालो. परंतु दवाखान्याचे पशुवैद्य हे नेहमी चांगले मार्गदर्शन करीत असल्याने पुढे या कालवडीचे काय करावे ? असे विचारले. ह्या कालवडीस एकच गर्भाशयाचे शिंग असल्याने गर्भ धारणा होणे निश्चित नाही असे असले तरी मी माझ्या कालवडीस विकणार नाही. गाभण न राहील्यास देवगाय म्हणून गावात सोडून देईन असे मी त्यांना सांगितले.

आपले असेच विचार असतील तर ही कालवड गाभण करण्यासाठी मी शर्तीचे प्रयत्न करेल व तशी संधी आपल्याला चालून आलेली आहे. आपले गाव हे कामधेनू दत्तक ग्राम योजनेअंतर्गत निवडले गेले असून योजनेअंतर्गत तीन वंधत्व निवारण शिबीरात तज्ञांचे मार्गदर्शन आपणास मिळेल आणि तो दिवस उजाडला. पहिले वंधत्व निवारण शिबीरात माझ्या कालवडीची तपासणी तज्ञ पशुवैद्य डॉ.महाजन, डॉ.शिंपी, डॉ.वर्भे यांच्याकडून झाली. त्यांनीही कालवडीच्या अपंगत्वाबाबत आश्चर्य व्यक्त केले. व औषधोपचार करून मार्गदर्शन केले. कृत्रिम रेतन करूनही कालवड गाभण रहात नव्हती. नैसर्गिक संयोगासाठी देवगाय असल्याने मी तिचे पाय बांधत नसल्याने ती नैसर्गिक संयोगासाठी थांबत नव्हती.

पुढील दुसऱ्या व तिसऱ्या वंधत्व निवारण शिबीरात तज्ञ पशुवैद्यकांकडून पुन्हा औषधोपचार केल्यानंतर एका आठवड्यानंतर कालवड माजावर येवून तिला दवाखान्यात कृत्रिम रेतन केले. यावेळी कृत्रिम रेतन केल्यानंतर कालवड सतत सोट गाळायची तो गाळाला नाही. एकवीस व बेचाळीस दिवासानंतरही कालवडीने माज दाखविला नाही. तीन महिन्यानंतर गर्भ तपासणी केली असता. आमचे पशुवैद्य श्री संदीप पाटील यांनी कालवड गाभण असल्याची आनंदाची बातमी सांगितली व मला अतिशय आनंद झाला.

माझ्या कालवडीच्या आयुष्यातील आई होण्याचा दिवस उजाडला दिनांक ०८/११/२०१३ रोजी तिला प्रसुती वेदना होवू लागल्या थोड्यावेळाने तीने सुंदर अश्या होलेस्टियन फ्रिजीयन जातीच्या कालवडीस जन्म दिला. मी तात्काळ आमच्या पशुवैद्यकांना कालवडीची प्रसुती होवून तीला कालवड झाल्याचे कळविले. त्यांनी तात्काळ येवून तिची तपासणी करून ती निरोगी असल्याचे व अपंगत्व नसल्याचे मला सांगितले.

माझी ही देवगाय आई झाल्याचे श्रेय मी कामधेनू दत्तक ग्राम योजनेअंतर्गत आयोजित वंधत्व निवारण शिबीरे व आमच्या पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुवैद्य श्री.संदीप पाटील यांच्या प्रयत्नांना देतो.

दिलीप निळकंठ पाटील
श्री.दिलीप निळकंठ पाटील



# पोटखराब जमिनीतून मिळाली हिरवी वैरण

## यशकथा



श्री.प्रविण निंबा पाटील
पशुपालक ,लोहटार
ता.पाचोरा जि.जळगाव

मी श्री. प्रविण निंबा पाटील , रा.लोहटार, ता.पाचोरा जि.जळगाव माझ्याकडे तीन एकर शेत जमीन आहे. जमीनीचे क्षेत्र कमी असल्याने मला चारा विकत घ्यावा लागायचा. आमच्या येथील पशुवैद्य श्री.संदीप पाटील यांनी मला पिंपळगाव हरेश्वर येथून फुले जयवंत वैरणीची ५ हजार ठोंबे मिळवून दिली व ३०० ठोंबे संपूर्णा जातीची दिली. माझ्याकडे जमीनीचे क्षेत्र कमी असल्याने मी पोट खराब क्षेत्रात सदर ठोंबाचे ठिबक सिंचनच्या सहाय्याने लागवड केली. सदर वैरणीची लागवड केल्याने मला हिरवा चारा विकत घ्यावा लागत नाही.

हिरवी वैरण माझ्या गार्यींना मिळाल्याने दुध उत्पादनात वाढ झाली. चारा विकत न घेतल्याने व दुध उत्पादनात वाढ झाल्याने माझा आर्थिक फायदा झाला.

आज माझ्या एक एकर क्षेत्रात संपुर्णा व फुले जयवंत ठोंबांची लागवड केली असुन गावातील व परिसरातील जवळपास ७५ ते ८० लाभार्थीनी माझ्याकडून ठोंबे नेवून लागवड केली. सदर बहुवर्षीय चारा माझ्याकडे मोठ्याप्रमाणात उपलब्ध झाल्याने मला पशुपालनाचे प्रोत्साहन मिळाले माझ्याकडे ३ संकरीत गायी होत्या. बहुवर्षीय चारा उपलब्ध झाल्याने आज माझ्याकडे ९ संकरीत गायी आहेत. माझे सुरूवातीला १८ लीटर दुध होते आज सरासरी ७० ते ७५ लीटर दुध उत्पादन होत आहे. त्यामुळे माझ्या उत्पन्नात भर पडली व माझे आर्थीक व कौटुंबिक जीवनमान सुधारले.यासाठी आमचे पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुवैद्य श्री.संदीप पाटील यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले आहे. त्याबद्दल वैरण विकासाच्या योजना राबवून मार्गदर्शन करणाऱ्या पशुसंवर्धन विभागाचे व आमच्या पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुवैद्य श्री.संदीप पाटील यांचे आभारी आहे.

प्रविन निंबा पाटील.

श्री.प्रविण निंबा पाटील



**चारा वाढवा पशुधन जगवा.**

# कुट्टी यंत्र मिळाल्याने झाली चाऱ्याची बचत

## यशकथा




श्री.देवचंद रामचंद्र जाधव
लोहटार,ता.पाचोरा

मी श्री.देवचंद रामचंद्र जाधव रा.लोहटार, ता.पाचोरा जि.जळगाव माझ्याकडे तीन गायी व १० म्हशी आहे. माझ्या मुलगा गुरांना रानात चरायला घेवून जातो. संध्याकाळी व सकाळी आम्ही गुरांना कोरड्या ज्वारी किंवा मक्याच्या चाऱ्याच्या पेंढ्या टाकतो. एका जनावरास तीन पेंढ्या प्रमाणे ३९ पेंढ्या लागत होत्या. कडबाचा पाला गुरे खात होती व तोटे शिल्लक पडून रहात होते. परंतु आमच्या पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुवैद्य श्री.संदीप पाटील यांनी पशुसंवर्धन विभागाकडून ७५% अनुदानावर स्वयंचलीत कडबा कुट्टी यंत्राचा लाभ मला मिळवून दिला. कडब्याची कुट्टी स्वयंचलित यंत्राने घरच्याघरी केल्याने कुट्टी करण्यासाठी लागणारा खर्च माझा वाचला व जनावरे तोटे खात नसल्याने चारा वाया जात होता. कुट्टी केल्याने जनावरे संपूर्ण चारा खावू लागले.

आज मला प्रती जनावर दोन पेंढ्याची कुट्टी लागते. म्हणजे प्रती जनावर एक पेंढीची बचत झाली. पशुसंवर्धन विभागामार्फत ७५% अनुदारावर कडबा कुट्टी यंत्र मिळाल्याने कडबा कुट्टी साठी लागणारा खर्चात व कडब्यात बचत झाल्याने माझा आर्थिक फायदा झाला व चाऱ्याची बचत झाल्याने मी पशुसंवर्धन विभागाचे व आमच्या पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुवैद्य श्री.संदीप पाटील यांचा आभारी आहे.

श्री.देवचंद रामचंद्र जाधव





**करा कुट्टी कडब्याची, बचत होईल चाऱ्याची**

# विशेष घटक योजना
# शेळी पालनातुन घेतले घर



श्री.दयाराम मोतीराम गोलाईत
बाळद बु।।, ता.पाचोरा जि.जळगाव

मी श्री.दयाराम मोतीराम गोलाईत, रा.बाळद बु।।, ता.पाचोरा जि.जळगाव मला २ मुले आहेत. ३५ वर्षापूर्वी माझे मुळ गाव वाडे, ता.भडगाव येथुन डोक्यावर पेटी घेवून हातमजुरी करण्यासाठी मी बाळद येथे आलो. मी व माझी पत्नी मजुरी करीत असल्याने येणाऱ्या पैशातुन घरखर्च चालवित होतो, परंतु हाती शिल्लक रहात नव्हते.

सुरूवातीला ४००/- रूपयांची पाट घेतली, ती गाभन राहून तीच्यापासून दोन पिले मिळाली. त्यापासून फायदा झाल्याने आपणास शेळी पालनातून आपली प्रगती होईल असे मला वाटले. परंतु आर्थिक परिस्थिती नसल्याने मी मोठ्या प्रमाणात शेळी पालन करू शकत नव्हतो. याबाबत मी आमचे पशुवैद्य श्री.संदीप पाटील, लोहटार यांना शेळीपालन करणेबाबत इच्छा व्यक्त केली. त्यांनी मला विशेष घटक योजनेबाबत माहिती देवून माझ्याकडून योजनेचा अर्ज भरून पंचायत समिती,पाचोरा येथे सादर केला.

विशेष घटक योजनेअंतर्गत मला तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार) मा.डॉ.एन.आर.पाटील साहेब यांनी सन २०१२-१३ मधे मंजूर शेळी गटाप्रमाणे निरोगी १० शेळ्या व १ बोकड खरेदी करून दिला. शेळ्यांना होणारे विविध आजार जंत निर्मुलन, लसीकरणाविषयी माहीती दिली. पहिल्या वर्षी मला २५ करडे मिळाले. करडे पाजुन उरलेले दुध मी गावातील ओम अवधुत दुध उत्पादक सोसायटी ,बाळद बु।। येथे पुरवठा केला. त्यापासुन मला दहा दिवसाचे ४०० ते ५०० रूपये मिळू लागले. घरखर्चासाठी त्याचा हातभार लागला. पुढील वर्षी २८ करडे मिळाले. पुढे यातील २५ करडे सरासरी ३ ते ४ हजार रूपये किमतीला विकुन त्यापासुन मिळालेल्या रकमेतुन ९० हजार रूपये किमतीचे घर मी घेतले. तसेच शेळ्यापासुन मिळालेल्या खतापासुन मला वर्षाला ३ ते ४ हजार रूपये मिळाले.

घरी दुध उत्पादन होत असल्याने मुलांना व संपूर्ण कुटुंबाला खाण्यापिण्यासाठी मुबलक दुध मिळाले. त्यामुळे मुलांच्या प्रकृतीत सुधारणा होवून स्वास्थ चांगले राहीले. शेळी गटाचे मी चांगल्या रितीने संगोपन केले म्हणून जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात आलेले विशेष घटक योजना ही माझ्यासाठी उपयुक्त ठरली असुन त्यामुळे मला रोजगाराचे साधन उपलब्ध झाले आहे.

सदर योजनेबाबत मी अत्यंत समाधानी असुन पशुसंवर्धन विभाग व मला शेळीपालनासाठी प्रोत्साहन देणारे आमचे श्री.संदीप पाटील यांचा आभारी आहे.

दयारामगो

श्री.दयाराम मोतीराम गोलाईत



# पशुखाद्याचा खर्च झाला कमी




श्री.भालचंद्र तुळशिराम पाटील ,
रा.बांबरूड खु।।(महादेवाचे), ता.पाचोरा

मी श्री.भालचंद्र तुळशिराम पाटील , रा.बांबरूड खु।।(महादेवाचे), ता.पाचोरा जि.जळगाव. माझ्याकडे ७ म्हशी , २ संकरीत गायी व २ बैल आहेत. त्यापैकी ४ म्हशी व १ संकरीत गाय दुबती आहे. रोज त्यांना प्रती दुधाळ जनावरे ८ किलो पशुखाद्य व भाकड जनावरांना २ किलो पशुखाद्य खाऊ घालतो.

आमच्या पाउवैद्यकीय दवाखान्याचे पशुवैद्य श्री.संदीप पाटील हे नेहमी जनावरांच्या व्यवस्थापनाविषयी आरोग्याविषयी माहिती देत असतात. त्यांनी मला पशुखाद्यास पुरक आहार असलेल्या अझोला विषयी माहिती देवून अझोलाचे कल्चर पशुवैद्यकीय दवाखशन्यातुन देवून माझ्या येथे खड्यात अझोला रोपन करायला लावले. १५ दिवसांनंतर अझोलाचे उत्पादन सुरू झाले. अझोलाच्या खड्यातुन मला रोज ४ किलो अझोला निघतो. जनावरे आवडीने खातात. ४ किलो अझोल्याचे उत्पादन रोज मिळते. त्यामुळे माझे रोज ४ ते ५ किलो पशुखाद्य वाचले. जनावरांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होवुन उत्पादन वाढले. मला अझोल्याची माहिती देवून पशुखाद्याचा खर्च कमी केल्याबद्दल मी आमचे पशुवैद्य श्री.संदीप पाटील यांचे आभार मानतो.

भालचंद्र तुळशिराम पाटील

श्री.भालचंद्र तुळशिराम पाटील





# उबवणुकीची अंडी ठरली फलदायी

# यशकथा

श्रीमती विमलबाई छोटु मासरे

लोहटार,ता.पाचोरा

मी श्रीमती विमलबाई छोटु मासरे रा.लोहटार, ता.पाचोरा जि.जळगाव. मला एक मुलगा व दोन मुली आहे. माझ्याकडे शेती नाही. माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह मजुरी करून चालतो. मला आमच्या गावातील पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुवैद्य श्री. संदीप पाटील यांनी उबवणुकीची २० अंडी दिली. त्यापासुन अठरा पिल्ले जन्माला आली. आज माझ्याकडे १५ कोंबड्या व दोन कोंबडे आहे. कोंबड्यांनी दिलेल्या अंड्यांची विक्री करून रोज मला ८० ते १०० रुपये मिळतात. त्याचा मला माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यास हातभार लागतो.

आमच्या पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुवैद्य श्री.संदीप पाटील यांनी उबवणुकीची अंडी दिल्याने मी माझ्या परसात कुकुटपालन करून माझ्या कुटुंबाच्या उपजिवीकेस आर्थिक मदत झाल्याने मी पशुसंवर्धन विभागाची व पशुवैद्य श्री.संदीप पाटील यांची आभारी आहे.

श्रीमती विमलबाई छोटु मासरे



# विमा रकमेतुन घेतली गाय
# यशकथा



**श्री.रमेश सुकदेव चौधरी**
**लोहटार,ता.पाचोरा**

मी श्री.रमेश सुकदेव चौधरी, रा.लोहटार ता.पाचोरा . मला एक मुलगा आहे. मी ट्रॅक्टर वर  वाहन चालकाचे काम करतो. माझ्याकडे २ संकरीत गायी होत्या दोन्ही गार्यींची विमा पशुधन विमा योजनेअंतर्गत करावा असा आग्रह आमचे पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुवैद्य श्री.संदीप पाटील यांनी केल्याने मी दोन्ही संकरीत गार्यींचा विमा केला. त्यापैकी एक गाय अचानक आजारी पडून दगावली. गाय मेली त्यादिवशी माझ्या मुलाला रडू आले. पप्पा आत आपण दुसरी गाय कशी घेवू. असा तो म्हणाला. पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुवैद्य मृत गायीस पाहण्यास आले असता त्यांनी सांत्वन केले व पशुधन विमा योजनेअंतर्गत गायीचा विमा असल्याने विमा कंपनीस संपर्क साधून नोंद केली. गायीच्या विमा संबंधी सर्व कार्यवाही पूर्ण झाली.

एके दिवशी पोष्टाने एक पाकीट माझ्यकडे आले. ते घवून मी पशुवैद्यकीय दवाखान्यात गेलो व ते पशुवैद्यकांना दाखविले. आनंदाने त्यांनी मला सांगितले ''रमेश भाऊ हा तर तुमच्या गायीच्या विमा रकमेचा धनादेश आहे.'' दुसऱ्या दिवशी गावात कामधेनू दत्तक ग्राम योजनेअंतर्गत जनावरांचे मलमुत्र व्यवस्थापनाचा कार्यक्रम दवाखान्यात असल्याने कार्यक्रमास उपस्थित प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मला धनादेश देण्यात आला. धनादेश वटवून मी माझ्या मुलाच्या इच्छेप्रमाणे दुसरी गाय विमा रकमेतून घेतली. पशुधन विमा नसता तर कदाचित मी दुसरी गाय घेवू शकलो नसतो. याचे श्रेय मी पशुधन विमा योजना राबविणाऱ्या पशुसंवर्धन विभागास व आमचे पशुवैद्य श्री.संदीप पाटील यांना देतो.

रमेश सुकदेव चौधरी

**श्री.रमेश सुकदेव चौधरी**

